महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९०००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:- १४४२/(अ)/मशिसेमविप/२०१७/२४ दिनांक :- २७ जून ,२०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय** :- महाराष्ट्र शिक्षण सेवा ( प्रशासन शाखा) गट ब मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ जिल्हा तांत्रिक सेवा, गट-क (DTS) या संवर्गातून पात्र उमेदवारांचा मुलाखत कार्यक्रम

**(टप्पा क्र. १)**

**संदर्भ** :- (१) जाहिरात क्रमांक ४०/२०१७
(२) आयोगाचे दिनांक २३ जून, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १३ ऑगस्ट २०१७ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण सेवा ( प्रशासन शाखा) गट ब मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ परीक्षेचा निकाल दिनांक १ एप्रिल २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

**२.** प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे जिल्हा तांत्रिक सेवा, गट-क (DTS) या संवर्गातून मुलाखतीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ११ ते १४ जुलै, २०२३ या कालावधीत खालीलप्रमाणे घेण्यात येणार आहेत.

| मुलाखत दिनांक | मुलाखतीचे ठिकाण | वेळ |
|---|---|---|
| दिनांक ११ ते १४ जुलै, २०२३ | त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नं ३४ सरोवर विहार समोर सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४ | सकाळी ०९ : ०० वा. |

**३.** मुलाखतीचा तपशीलवार कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येणार आहे. मुलाखतीच्या अनुषंगाने संबंधित उमेदवारांनी मुलाखती करीता विहित दिनांकास व विहित वेळेवर उपस्थित राहावे.

**४.** मुलाखत पत्र उमेदवारांच्या प्रोफाईलवर स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येईल.

**५.** उर्वरित उमेदवार व विविध न्यायालयीन प्रकरणी मा.न्यायालयाने/न्यायाधिकरणाने पारित केलेल्या अंतरिम आदेशानुसार मुलाखतीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती स्वतंत्ररित्या आयोजित करण्यात येतील.

ठिकाण: नवी मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर अराजपत्रित )
महाराष्ट्र लोकसेवा आयोग